



REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख १७ जुलै १९४६ अंक २९



श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

कंपनीनें चार लक्ष रुपयांचे ऑर्डिनरी शेअर दर शेअरला रु. ५ प्रिमिअम असे विक्रीस काढले आहेत.

**युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण** वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टके डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

## विविध माहिती

**काळी यादी रद्द केली**—शत्रुपक्षीय फर्म्सशीं व्यवहार केल्याबद्दल अमेरिकेनें आपल्या देशांतील १५,४४६ व्यक्ती व पेढ्या ह्यांचीं नांवं काळ्या यादींत टाकलीं होतीं. ह्या यादींतील लोकांना इतर अमेरिकनांशीं व्यापारी संबंध ठेवण्यास बंदी केलेली होती. ब्रिटिश व कनेडियन सरकारांशीं अमेरिकेनें वाटाघाटी करून त्यानें आतां काळी यादी रद्द केल्याचें जाहीर केलें आहे. शत्रुपक्षीयांचें जागतिक व्यापारी क्षेत्रांतील महत्त्व नष्ट करण्याचें धोरण अमेरिकेनें सोडलेलें नाहीं, हें त्याबरोबरच स्पष्ट करण्यांत आलें आहे.

**मुंबईतील विमा कंपन्यांचे नोकर**—मुंबई शहरांत एकूण ८० विमा कंपन्या आहेत, त्यांत १०,००० नोकर कामावर आहेत.

**बनावट कागदपत्र व अफरातफर**—इंटर नॅशनल बँक ऑफ इंडियाच्या मुंबई कचेरींतील कांहीं हिशेबाच्या वह्या व कागद पोलिसांनीं नेले. बँकेच्या एका माजी अधिकाऱ्यानें बनावट कागदपत्र करून ६ लक्ष रुपयांच्या हुंड्यांचे बाबत अफरातफर केली त्याबाबत हा प्रकार झाली असें समजतें. कांहीं दिवसांपूर्वी रिझर्व बँकेनें इंटरनॅशनल बँकेस मुदतीं ठेवी घेण्यास बंदी केली असल्याचें प्रसिद्ध झालें होतें.

**अमेरिकेचें इंग्लंडला कर्ज**—अमेरिका व इंग्लंड ह्यांचेमधील कर्जविषयक करारास अमेरिकेची कायदेशीर मान्यता आतां मिळाली आहे.

**कागदाच्या किंमती**—कागदाच्या कमाल किंमती हिंदुस्थान सरकारनें उतरविल्या आहेत त्या १५ ऑगस्टपासून अंमलांत येतील.

**पागडी मागणारे घरमालक**—पागडी मागणाऱ्या घरमालकांस अटक करण्यास मुंबई येथील पोलिसांनीं प्रारंभ केला आहे.

**चित्रपट खातें**—रशियानें रशियन चित्रपट सर्वंद जगांत उत्कृष्ट व्हावेत ह्यासाठी एक स्वतंत्र सरकारी चित्रपट खातें निर्माण केलें आहे.

**पुणें विश्वविद्यालयाच्या स्थापनेची तयारी**—जयकर कमिटीच्या शिफारसींप्रमाणें पुणें विश्वविद्यालयाच्या बिलाचा मसुदा तयार करण्यांत आला असून तो लवकरच मुंबई सरकारास सादर करण्यांत येईल.

**तह परिषदेस २१ राष्ट्रांस निमंत्रणः**—तह परिषद् पॅरीस येथें २९ जुलै रोजीं भरविण्याचें ठरलें आहे. २१ राष्ट्रांना परिषदेचें आमंत्रण देण्यांत आलें आहे. निमंत्रक राष्ट्रांत चीनचें नांव असावें, ही चीनची मागणी मान्य करण्यांत आलेली नाहीं. परिषदेच्या कामाच्या नियमांचा एक कच्चा खर्डा निमंत्रणाबरोबर धाडण्यांत आला आहे परंतु हे नियम परिषदेवर बंधनकारक नाहींत.


**—: साठे बिस्किटें :—**

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

आंध्र खादीचे (म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे) —एकमेव विक्रेते—

**खादी मन्दिर**

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुले सशक्त होतात

सांडू प्रेग युटेरो
गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लिमिटेड (चेंबूर मुं.)

पुणें चीफ एजंटसः—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक पुणें

छत्रे यांचा -कोल्हापुरी- संगीत चिवडा
वापरून पाहुण्यांस खूष ठेवा.
किंमत १ रत्तलाला २ रुपये.
मालकः—एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड
फो. नं. ३३८४९ ] मुंबई ४.

डॉ. गोखले यांचे ज्वरबिंदू







फाऊंटन पेनकरितां
**लोटस**
शाई
सर्वत्र मिळते.

पंढरीनाथ ब्रिलिअन्टाईन वापरा



# अमेरिकेंतील युद्धोत्तर अर्थव्यवस्था

जर्मनी-इटली-जपान या फॅसिस्ट राष्ट्रत्रिकुटाविरुद्ध लोकशाही राष्ट्रांनीं चालविलेलें युद्ध जिंकून आतां वर्षाचा काळ लोटला आहे. फॅसिस्ट राष्ट्राविरुद्ध युद्ध चालवितांना इंग्लंड व अमेरिका या पाश्चिमात्य लोकशाही राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेंत खूपच बदल घडून आला. नव्हे, तसा बदल मुद्दाम घडवून आणून अर्थव्यवस्था संपूर्णपणें युद्ध जिंकण्याच्या कार्याच्या लगामीं लावली तरच तरणोपाय आहे असें या राष्ट्रांतील राजकीय पुढाऱ्यांना लवकरच आढळून आलें. आधुनिक पद्धतीचें युद्ध चालविणें भाग पडल्यामुळें या देशांतील अर्थव्यवस्थेला सुद्धां सर्वंकष आर्थिक नियंत्रणाचें (Totalitarian Economy) स्वरूप कमी अधिक प्रमाणांत आलेलें होतें. अर्थात् फॅसिस्ट राष्ट्रांत ज्या एकतंत्री, अरेरावी आणि जुलमी पद्धतीनें युद्धसन्मुख अर्थव्यवस्था युद्धाच्या हेतूनें युद्धपूर्व कालांतच प्रस्थापित केली गेली होती, त्या पद्धतीनें मात्र हें कार्य करण्यांत आलें नाहीं. सोव्हिएट अर्थव्यवस्थाही याच स्वरूपाची करण्यांत आलेली होती. अशा रीतीनें जगांतील सर्वच प्रमुख उद्योगप्रधान पुढारलेल्या राष्ट्रांत अनिर्बंध अर्थव्यवस्थेचें युग लोपत चाललें असून, अनिबंध, आणि नियोजित अशा अर्थव्यवस्थेचा उदय होत आहे. असें असलें तरी इंग्लंड-अमेरिकेसारख्या परंपरागत लोकशाही राष्ट्रांची नियुक्त अर्थव्यवस्था, रशियाची नियुक्त अर्थव्यवस्था आणि पराजित फॅसिस्ट राष्ट्रांची नियुक्त अर्थव्यवस्था यांच्या हेतूंत कार्यपद्धतींत, धोरणांत आणि प्रत्यक्ष व्यवहाराच्या तपशीलांत महत्त्वाचे फरक आहेत हा महत्वाचा मुद्दा विसरून चालणार नाहीं; तथापि हा विषय स्वतंत्र असल्यामुळें त्याची चर्चा तूर्त बाजूला ठेवून युद्धोत्तर पुनर्घटना व सनिर्बंध नियुक्त अर्थव्यवस्था यांचे अमेरिकेंत आज कसे संबंध आहेत येवढ्यापुरताच विचार आज करणें जरूर आहे, अमेरिकेसारख्या प्रगल्भ दशेप्रत पोचलेल्या देशांत युद्धोत्तर पुनर्घटनेची व तदनुषंगिक आर्थिक धोरणाची दिशा काय व कशी ठरविण्यांत येत आहे हें लक्षपूर्वक पाहिल्यास हिंदुस्थानसारख्या देशांना बरेंच मार्गदर्शन होण्याचा संभव आहे. राजकीय स्थित्यंतराच्या वेशीवर उभ्या असलेल्या हिंदुस्थानचे आर्थिक प्रश्न सोडविण्याला अशा अभ्यासामुळें मदत होईल यांत शंका नाहीं.

युद्धकालीं अमेरिकेंत वस्तूंच्या किंमतीवर नियंत्रण ठेवणारा जो कायदा जारी करण्यांत आला होता त्याची मुदत ता. ३० जून रोजीं संपली. हा कायदा पुन्हा अंमलांत येऊं नये म्हणून अमेरिकेंतील बड्या भांडवलदारांच्या वृत्तपत्रांनीं गेले कांहीं महिने एकसारखी हाकाटी चालविलेली होती. उलट प्रे. ट्रुमन यांच्या सरकारची अशी विचारसरणी होती व आहे कीं, युद्धकालीं स्वीकारलेल्या स्वंग पैशाच्या धोरणाचे परिणाम जोंपर्यंत दृग्गोचर होत आहेत तोंपर्यंत किंमतीवरील नियंत्रणें उठविणें धोक्याचें आहे. कारण त्यामुळें सरकारला हेंच स्वंग पैशाचें धोरण पुढें चालविणें भाग पडेल. यासंबंधीं बोलतांना प्रेसिडेंट ट्रुमन म्हणाले कीं, "अर्थोत्पादनाला प्रोत्साहन मिळण्यासाठीं नफ्याचें आमिष असणें इष्टच आहे. हौस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हपुढें आज जें अर्धवट नियंत्रणाचें बिल मांडण्यांत येत आहे त्यामुळें पदार्थांच्या किंमतींत आणि नफ्यांत वाढ होणार आहे. अमेरिकेंतील उत्पादन झपाट्यानें वाढत असतां आणि नफ्याचें प्रमाण योग्य तितकें असतांना सुद्धां अशा तऱ्हेची वाढ होणें इष्ट नाहीं." कोणत्याही देशांतील चलन-विस्ताराला आळा घालण्याच्या कार्यक्रमांत अर्थोत्पादनला जोराची गति देणें हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. कारण अर्थोत्पादन धडाक्यानें चालू झालें कीं लोकांना कामें मिळतात, काम मिळालें कीं पगार व मेहनताना मिळूं लागतो; अर्थोत्पादन पद्धतशीरपणें होऊं लागल्यावर बाजारांत माल भरपूर प्रमाणांत येऊं लागून निर्बंध मुक्त (Free) बाजारपेठ प्रस्थापित करण्याच्या मार्गांतील पहिला मोठा अडथळा नाहींसा होतो. युद्धकालीं चालू असलेल्या भावनियंत्रण कायद्याला एकदम मूठमाती दिली तर युद्धकालीन अर्थव्यवस्थेचें मामुली अर्थव्यवस्थेंत रूपांतर होण्याच्या मार्गांत अनेक अडचणी उत्पन्न होतील. इतकेंच नव्हे तर, या अचानक प्राप्त झालेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग करून कारखानदार वर्ग व धाऊक व्यापारी वर्ग आपल्या तुंबड्या भरण्याचा अश्लाघ्य प्रयत्न करील अशी सार्थ भीति अमेरिकन सरकारला वाटत आहे. म्हणूनच काँग्रेसनें तयार केलेल्या मर्यादित स्वरूपाच्या भावनियंत्रण कायद्याला संमति न देतां प्रे. ट्रुमन यांनीं हौस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह सभेपुढें एक ठराव अनुज्ञेकरतां मांडला. या ठरावान्वयें सध्यांच्या मुदत संपलेल्या भावनियंत्रण कायद्याची मुदत कांहीं काल वाढविण्याची मागणी करण्यांत आलेली आहे, या अवधींत युद्धोत्तर नवीन परिस्थितीशीं अधिक जुळता असणारा असा नवा कायदा ट्रुमन यांचें सरकार तयार करणार आहे. अशा रीतीनें युद्धोत्तरकालीं उत्पन्न झालेल्या अनिश्चित आर्थिक परिस्थितींतून अमेरिकन सरकार आपला मार्ग काढूं पहात आहे. प्रे. ट्रुमन यांच्या या धोरणाला अमेरिकन लोकमताचा एकंदरीनें पाठिंबा दिसून येत असला तरी प्रत्यक्ष व्यवहारांत अशा तऱ्हेचे कायदे अंमलांत आणणें किती कठीण असतें याचा अनुभव आपणास हिंदुस्थानांत येत आहेच. ज्या अधिकाऱ्यांच्या करवीं कायदे अंमलांत आणावयाचे असतात त्यांचा प्रामाणिकपणा, कार्यनिष्ठा आणि कार्यक्षमता यांवरच अखेरची मदार असली तरी जनतेचें सहकार्यही मोठ्या प्रमाणावर मिळणें जरूर असतें. अमेरिकन भावनियंत्रण कायदा संपुष्टांत येण्याच्या अपेक्षेनें अमेरिकेंतील जनतेंत कशा प्रकारची वृत्ति निर्माण झाली होती याबद्दलची माहिती थोड्याबहुत प्रमाणांत उपलब्ध झाली असून त्यावरून प्रे. ट्रुमन यांचें धोरणच कसें इष्ट आहे तें दिसून येतें.

भाव-नियंत्रण कायद्याची मुदत संपण्यापूर्वींच दोन महिने अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या नाडीचे ठोके मंद पडूं लागल्याचीं दिसूं चिन्हें लागलीं होतीं. अमेरिकन अर्थशास्त्रज्ञांच्या दूरदृष्टीला आर्थिक अरिष्टाचीं चोरपावलें आतांपासूनच ऐकूं येऊं लागलीं आहेत. हें आर्थिक अरिष्ट टाळण्याचा उपाय त्यांना दिसत नसून येत्या दीड दोन वर्षांत अमेरिकन उद्योगधंद्यावर मंदीची छाया पडेल असा अंदाज करण्यांत येत आहे. याच्या उलट अमेरिकन सरकार निर्बंधित अर्थपद्धतीमधील पैशाच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवून अरिष्ट टाळण्याचा, निदान तें लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. गेल्या महायुद्धांतील विजयश्री दृष्टिपथांत आली असतांनाच दुर्दैवानें कालवश झालेले प्रे. रूझवेल्ट यांनीं १९३२ सालीं अमेरिकेवर असलेल्या आर्थिक अवकळेला उतारा म्हणून एन. आर. ए. (National Recovery Act.) सारखे कायदे केल्याचें प्रसिद्धच आहे. तशाच प्रकारचे उपाय जरूर तर ते प्रेसिडेंट ट्रुमन अंमलांत आणतीलही. पण या उपायांची हास्यास्पदता तेव्हांच स्पष्ट झालेली आहे. उदाहरणार्थ, त्यावेळीं सार्वजनिक उपयोगाचीं मोठमोठीं कामें काढण्यांत आलीं, व त्यासाठीं लाखों अमेरिकन मजुरांना खोरीं फावडीं घेऊन कामावर लावण्यांत आलें. परंतु त्याचवेळीं जमीन उकरणारीं व माती इकडची तिकडे करणारीं वाफेचीं व विजेचीं प्रचंड यांत्रिक खोरीं-फावडीं गंजून चाललेलीं होतीं, किंवा अपरंपार पिकलेला कापूस बाजारांत आला तर कपाशीचा भाव पडेल म्हणून हजारों एकर बहरलेला कापूस शेतांतच जमीनदोस्त करण्यांत आला, व त्यासाठीं शेतकऱ्याला आर्थिक मदत देण्यांत आली.

अमेरिकेंतील साप्ताहिकें व मासिकें यांच्या खपांत गेल्या कांहीं महिन्यांत खूपच घट झालेली आहे. युद्ध संपल्यानंतरच्या तेजीच्या कालांत अमेरिकेंत सुमारें ७०० नवीं नियतकालिकें सुरू करण्यांत आलीं होतीं. परंतु त्यांतील बऱ्याच नियतकालिकांचे गठ्ठे विक्रेत्यांना प्रकाशकाकडे परत पाठवावे लागत आहेत. याला केवळ आर्थिक कारणाशिवाय दुसरींही कारणें आहेत. यापेक्षां दुसरें अधिक सूचक लक्षण आहे. अमेरिकेंतील रेडिओ कंपन्यांच्या उत्पन्नांत बराच मोठा भाग जाहिरातदारांकडून येणाऱ्या पैशाचा असतो. गेल्या कांहीं महिन्यांत या उत्पन्नांत बरीच घट झालेली आहे. अन्न व चारा यांच्या दुर्मिळतेमुळें पुष्कळ कंपन्यांजवळ विकण्यास कांहीं मालच नाहीं. त्यामुळें त्यांनीं रेडिओवरील आपल्या जाहिरातीही बंद केलेल्या आहेत. स्वंग पैशाच्या धोरणास पायबंद घालावयाचा असेल तर नुसतें अर्थोत्पादन वाढवून चालणार नाहीं. एकंदर उत्पादनावर मध्यवर्ती नियंत्रण ठेवून उत्पादनसाधनें ( Capital

Goods) व चारितार्थसाधनें (Consumers Goods) यांच्या निर्मितीत समतोलपणा राखला पाहिजे आणि सर्व चरितार्थ साधनें विकली जाण्याइतकी क्रयशक्ति अमेरिकन जनतेंत वाढली गेली पाहिजे. अमेरिकन सरकार बड्या मांडवलदारांच्या आहारीं गेलें तर वरील उपाय अमलात आणणें शक्यच होणार नाहीं. तें कसेंही होवो, अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या भवितव्याशीं जगांतील आर्थिक धागेदोरे गुंतलेले आहेत, आणि म्हणूनच अमेरिकन अर्थव्यवस्था मनुष्यकृत मंदीच्या वावटळींत न सांपडतां शिरसलामत बचावणें अगत्याचें आहे. तसें झालें नाहीं तर अस्ताव्यस्त झालेल्या या आर्थिक अनर्थांतून अत्यंत अनिष्ट व घोर असे राजकीय परिणाम हालाहल विषासारखे बाहेर पडतील, आणि त्याची बाधा रशिया सोडून सर्व जगाला झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

# स्फुट विचार

## नियोजन खातें बंद केल्याबद्दल सरकारवर टीका

नॅशनल प्लॅनिंग कमिटीची एक अनौपचारिक सभा मुंबई येथें गेल्या आठवड्यांत पं. जवाहिरलाल ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. तिनें, हिंदुस्थान सरकारनें आपलें नियोजन खातें बंद केल्याबद्दल त्यावर कडक टीका केली. घटना समितीनें ठरवावयाची हिंदी घटना पुढें कशीही होवो, आणि त्या घटनेंतील मध्यवर्ती सरकारची सत्ता व अधिकार कसेहि असोत, हिंदी लोकांच्या आर्थिक सुधारणेस व्यापक मध्यवर्ती नियोजन आणि प्रांतिक सरकारांच्या योजनांचें एकसूत्रीकरण ह्यांची अत्यंत आवश्यकता आहे. आंकडेवार माहितीच्या अभावीं कोणत्याहि योजना आखणें कठीण असतें आणि हिंदुस्थानांतील ह्यासंबंधांतील परिस्थिति तर अत्यंत असमाधानकारक आहे. ती सुधारण्याचें काम नियोजन खात्याचें आहे. परंतु नियोजन खातें बंद करून हिंदुस्थान सरकारनें सध्याच्या संक्रमण काळांत मोठी घोडचूक केलेली आहे, असें आपलें मत नॅशनल प्लॅनिंग कमिटीनें नमूद केलें आहे. सध्याचें तात्पुरतें सरकार फार दिवस टिकणारें नसेल तर नियोजन खातें बंद ठेवण्याचें कारण नव्हतें आणि तें सरकार टिकावू व्हावयाचें असेल तर नियोजन खातें चालू ठेवणें आवश्यकच होतें. नियोजन खात्याची आजवरची कामगिरी तरी कोठें उत्साहजनक आहे! कळकळीच्या व लोकमतानुवर्ती मंत्र्यांचे हातीं नियोजन आल्याविना खरी सुधारणा अशक्य आहे.

## अमेरिकेस माल पुरविणारे प्रमुख देश

अमेरिकेची आयात आतां पुष्कळच वाढली आहे. १९२९ च्या आयातीपेक्षा ती ज्यास्त आहे, इतकेंच नव्हे तर १९२०च्या आयातीच्या आकड्यांशीं ती बरोबरी करूं लागली. एकूण आयातीपैकीं ६०% आयात १० देश पुरवीत आहेत. अमेरिकेच्या आयातीस माल पुरवणाऱ्या प्रमुख १० देशांची क्रमवार यादी खालीं दिली आहे:–

| १९३७ | १९४६ |
|---|---|
| कॅनडा | कॅनडा |
| ब्रिटिश मलाया | ब्राझील |
| ग्रेट ब्रिटन | क्युबा |
| जपान | हिंदुस्थान |
| क्युबा | मेक्सिको |
| अर्जेंटिना | अर्जेंटिना |
| फिलिपाइन्स | द. आफ्रिका |
| ब्राझिल | कोलंबिया |
| ने. ईस्ट इंडीज | ऑस्ट्रेलिया |
| चीन | ग्रेट ब्रिटन |

वरील याद्यांची तुलना केली, तर १९३७ मधील कांहीं देश १९४६ च्या यादींत अजिबात दिसत नाहींत व कांहींचें यादींतील स्थान बदललेलें आहे. कॅनडानें आपला पहिला अनुक्रम कायम राखला आहे आणि ब्राझीलनें आठव्या जागेवरून दुसऱ्या जागेवर उडी मारली आहे. हिंदुस्थानाचें १९३७ च्या यादींत नांवहि नव्हतें; तो आतां चवथा आला आहे. अमेरिकेकडे हिंदुस्थान माल पाठवीत आहे, त्यापैकीं दोन पंचमांश भाग आहे चहा, फळें, कापूस, लोकर, कातडी, इत्यादींचा अनुक्रम खालीं लागतो. मेक्सिकोनेंहि हिंदुस्थानासारखीच आघाडी मारली आहे. ग्रेट ब्रिटनमात्र तिसऱ्या जागेवरून दहाव्या स्थानवर गेला आहे.

## मध्यवर्ति सरकारचें अधिकारक्षेत्र व्यापक पाहिजे

ब्रिटिश मंत्रिशिष्टमंडळाच्या योजनेप्रमाणें संरक्षण, परराष्ट्रीय राजकारण व वहातुक एवढींच खातीं नियोजित मध्यवर्ती सरकाराकडे ठेवण्यांत आलीं आहेत. त्या कारणानें, तें सरकार दुबळें होईल, इतकेंच नव्हे तर त्याचा कारभार अशक्यप्राय होईल, अशी भीति त्या योजनेवर व्यक्त करण्यांत आलेल्या विचारवंतांच्या मतांमध्यें त्यावेळींच व्यक्त झालेली होती. आर्थिक बाबतींत घटकांवर अवलंबून असलेलें मध्यवर्ती सरकार आपली जबाबदारी पार पाडण्यास समर्थ होणें शक्य नाहीं. कॉंग्रेसचे नवे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांनीं गेल्या आठवड्यांत ह्या प्रश्नाचा उल्लेख करून मध्यवर्ती सरकारचें कार्यक्षेत्र वाढविणें व त्यास कर लादण्याचे व्यापक अधिकार देणें कसें अपरिहार्य होणार आहे, हें स्पष्ट केलें. ह्या महत्त्वाच्या बाबीवर त्यांनीं व्यक्त केलेले विचार सर्व प्रगतिप्रिय प्रतिनिधी घटना समितींत तडीस नेतील, हें उघड आहे. "संरक्षण आणि वहातुक हीं मूलभूत उद्योगधंद्यांवर अवलंबून असल्याकारणानें ते उद्योगधंदे मध्यवर्ती सरकारच्या कक्षेंतच राहिले पाहिजेत संरक्षण ह्या विषयाची व्याप्ति वाढतच रहाणार, हें उघड आहे. परराष्ट्रीय राजकारणाचा परराष्ट्रीय व्यापाराशीं फार निगडित संबंध आहे, तेव्हां मध्यवर्ती सरकाराचा त्यावर, परराष्ट्रीय बाजारपेठा, कर्जें, चलन, इत्यादींवर ताबा अवश्यमेव पाहिजे. एकाद्या प्रांतावर अथवा संस्थानावर आपत्ति कोसळी तर मध्यवर्ती सरकारास मध्यें पडण्याचा केव्हांहि अधिकार असला पाहिजे. मध्यवर्ती सरकारचा अधिकार आज कितीहि मर्यादित ठेवला तरी तो वाढणें अपरिहार्य आहे." वरील प्रकारें पंडित नेहरूंनीं आपले विचार घटना समितीच्या बैठकीचे आधींच मांडून त्या समितीच्या कार्याची बैठक स्पष्ट करून दाखविली आहे. मध्यवर्ती सरकार लुळें करून, त्यास प्रांतांच्या भिकेवर जगण्याचा कांहींचा मतलबी डाव कॉंग्रेसचे पुढारी टिकूं देणार नाहींत हें आतां अधिकृत रीत्या जाहीर झालें आहे.

**न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि. मुंबई**—(अध्यक्षः श्री. मा. रा. जोशी. मॅनेजिंग एजंट्स, मराठे आणि कं. वार्षिक सभाः २७–७–४६) वरील कंपनीस ३१–३–४६ अखेर संपलेल्या वर्षी १२,९२८ रुपयांचा घसारा काढून १३,९०२ रुपये निवळ नफा झाला. भागीदारांस ५% डिव्हिडंड देण्यांत येणार आहे. ४००० रुपये कॉंटिन्जन्सी रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत येत आहेत. कंपनीनें प्रत्येकी ५० रुपयांचे ४,००० नवे शेअर्स विक्रीस काढले आहेत, ते प्रथम भागीदारांस देऊं केले आहेत.

**कोशी नदीवर धरण**—निपाळ व बिहार ह्यांतून वहाणाऱ्या कोशी नदीस पावसामुळें व वितळणाऱ्या बर्फामुळें वरचेवर महापूर येतात. नदीवर १५ ते २० कोटि रुपये खर्चून धरण बांधण्याची व कालवे काढण्याची योजना आखण्यांत आली आहे. सबंद योजना पुरी होण्यास १० वर्षे लागतील.

**ब्रेटन वुडस संस्थांवर हिंदुस्थानाचें प्रतिनिधित्व**—इंटरनॅशनल मोनेटरी फंड व इंटरनॅशनल बँक ह्यांचेवर हिंदुस्थानाचे एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर कायम रहातील, अशी व्यवस्था झाली आहे. ह्या डायरेक्टरांची प्रथम निवड झाली, तेव्हां रशियानें वरील संस्थांचें सभासदत्व मान्य केलेलें नव्हतें आणि त्याची जागा हिंदुस्थानास आपोआप मिळाली. रशिया मागाहून जरी आला, तरी हिंदुस्थानाची जागा जाणार नाहीं, कारण सप्टेंबर १९४८ मध्यें निवडणूक होईल तीमध्यें हिंदुस्थान स्वतःच्या मताचे जोरावर निवडून येईलच.

# हिंदुस्थानाचें इंग्लंडमधील साठलेलें येणें

## कर्जाची रकम कमी करण्याचा गैरवाजवी प्रचार

### "योग्य हप्त्यांनीं कर्ज फेडण्यास इंग्लंड समर्थ आहे"

रिझर्व्ह बँकेचे आर्थिक सल्लागार, श्री. जे. व्ही. जोशी, ओ. बी. ई. ह्यांनीं गेल्या रविवारीं पुणें येथील आपल्या जाहीर भाषणांत वरील विषयाचें विवेचन केलें, श्री. जोशी ह्यांचा प्रस्तुत विषयावरील अभ्यास व अधिकार ह्यांस साजेल अशा रीतीनें त्यांनीं विषयाची मांडणी केली. त्यांच्या भाषणांतील महत्त्वाचे मुद्दे खालीं दिले आहेत:—

परराष्ट्रीय व्यापारांत हिंदुस्थानचें येणें निघे, तें युद्धकाळांत अधिकच वाढलें व तें स्टर्लिंगच्या स्वरूपांत इंग्लंडमध्यें गोठून पडलें. हिंदुस्थानाच्या प्रत्यक्ष्य बचावास आवश्यक नसलेला युद्धखर्च संयुक्त राष्ट्रांनीं हिंदुस्थानांत केला त्याचे पैसे त्यांनीं स्टर्लिंगच्या स्वरूपांत दिले. हिंदुस्थाननें कित्येक बाबींवर ब्रिटिश सरकारतर्फे खर्च केला, त्याचा हिशेबहि स्टर्लिंगमध्येंच करण्यांत आला.

### युद्धखर्चाच्या वांटणींतील हिंदुस्थानचा वांटा

हिंदुस्थानाचें इंग्लंडमध्यें येणें साठलें तें कमी रकमेवर तोडण्यांत आलें पाहिजे असा ब्रिटिश आर्थिक वृत्तपत्रांचा प्रचार चालू आहे, त्यांत तथ्य नाहीं. युद्धखर्चाच्या रकमेची करण्यांत आलेली वांटणी हिंदुस्थानास अनुकूल व इंग्लंडला प्रतिकूल अशी झालेली आहे, हा त्या वृत्तपत्रांचा मुद्दा मांडताना त्या वाटणीस वृत्तपत्रांनीं जीं विशेषणें दिलीं आहेत, तीं त्या पत्रांच्या दर्जास शोभणारीं नाहींत. हिंदुस्थानानें स्वतःच्या बचावाचा खर्च सोसावा, परंतु इंग्लंड व इतर संयुक्त राष्ट्रें हिंदुस्थानाच्या सरहद्दीवर जपानशीं युद्ध करीत होतीं, त्याचा खर्च हिंदुस्थानवर पडूं नये असें खर्चाच्या वाटणीचें तत्त्व ठरलें होतें. सर्व देशांची स्वार्थत्यागाची पातळी समान असावी हें तत्त्वच युद्धखर्चाच्या वाटणींत वाजवी समजलें पाहिजे. हें तत्व विचारांत घेतां, हिंदुस्थानाचें दर माणशीं उत्पन्न इंग्लंडच्या एक विसांश व अमेरिकेच्या एक पंचविसांश ते एक तिसांश असल्याकारणानें, हिंदुस्थानचा स्वार्थत्याग इतर दोन देशांच्यापेक्षा अधिकच भरेल. युद्धकाळांत हिंदुस्थानांतील लोकांच्या रहाणीचे मानावर फारच अयोग्य परिणाम झाला; उलट इंग्लंडमधील अन्न—वस्त्राचें मान पूर्वीप्रमाणेंच राखण्यांत आलें, इतकेंच नव्हे तर कांहीं बाबतींत युद्धपूर्वमानांत सुधारणाच झाली. अमेरिकेंत तर युद्धकाळांत रहाणीचा दर्जा वाढला. जपाननें युद्धांत प्रवेश केल्यानंतर, त्यापूर्वी ठरविण्यांत आलेली खर्चाची वाटणी सदोष ठरली, असा ब्रिटिश आर्थिक वृत्तपत्रांचा आणखी एक मुद्दा आहे. ह्याचा अर्थ जपान युद्धांत सामील झाल्यानंतर हिंदुस्थानानें ठरल्यापेक्षा जास्त रकम युद्धखर्चासाठीं दिली पाहिजे असा होतो. हिंदुस्थानाच्या युद्धखर्चाची मर्यादा युद्धपरिस्थिति पालटली त्याप्रमाणें विस्तार पावत गेलेली आहे, आणि जपान युद्धांत पडल्यानंतर हिंदी लष्करी खर्च कितीतरी पटीनें वाढला आहे. १९३९–४० सालीं हिंदी लष्करी खर्च फक्त ५० कोटि रुपये होता, तो त्यानंतरच्या वर्षी ७५ कोटि रुपये झाला. हा खर्च वाढत जाऊन १९४४–४५ मध्यें तो ४५० कोटींवर गेला. म्हणजे त्यांत ९ पट वाढ झाली. जपानचा युद्धांत प्रवेश झाल्यावर हिंदी लष्करी खर्च पुष्कळच वाढला, हें वरील आकडे स्पष्ट करतात. हिंदुस्थानाचें इंग्लंडमधील येणें छाटल्यानें हिंदी लोकांवरील आर्थिक बोजा वाढणार नाहीं, असेंहि सांगण्यांत येत आहे. हा मुद्दा मुळींच तर्कशुद्ध नाहीं. भांडवली खर्च इतका काळ तहकूब ठेवला आहे, कारखान्यांतील यंत्रसामुग्री झिजली आहे, घरें व इतर बांधकामें अडून राहिलीं आहेत. ह्या सर्व गोष्टी इंग्लंडमधील सांठलेल्या येण्यांतून करावयाच्या आहेत आणि तें येणें तोडलें तर हिंदी लोकांवर अन्याय्य बोजा बसणार आहे. युद्धकाळांत हिंदी लोकांचें, विशेषतः मध्यम व कनिष्ठ वर्गाचें, रहाणीचें मान उतरलें आहे. त्या वर्गाचें नुकसान भरून काढण्याचा एकच मार्ग म्हणजे हिंदी राष्ट्रीय उत्पन्न वाढविणें व त्यासाठीं पुनर्घटनेच्या योजना आखून पार पाडणें हा होय. हिंदुस्थानांतील किंमती फार वाढलेल्या होत्या, त्यामुळें हिंदुस्थानाचें इंग्लंडमधील येणें अवास्तव फुगलें आहे, हा ब्रिटिशांचा आणखी एक मुद्दा आहे. परंतु, तो वस्तुस्थितीस धरून नाहीं. हिंदुस्थानानें इंग्लंडला लावलेल्या किंमती वाजवी होत्या; त्यांत नफेबाजी करण्यांत आलेली नाहीं, असा प्रत्यक्ष ब्रिटिश पार्लमेंटरी सिलेक्ट कमिटीनें अभिप्राय व्यक्त केलेला आहे, हिंदी लोकांना जी किंमत पडत असे, त्यापेक्षा कमी किंमतीला कितीतरी माल हिंदुस्थानानें इंग्लंडला दिलेला आहे, असें ह्या कमिटीनें स्वतःच कबूल केलें आहे. हिंदी किंमतींचा इंडेक्स नंबर पुष्कळ चढला होता, परंतु तो हिंदुस्थानांतील ब्रिटिश खरेदीस लागू नाहीं. कारण, इंग्लंडनें हिंदुस्थानांत माल घेतला तो कांहीं खुल्या बाजारांत घेतला नाहीं. हिंदुस्थान सरकारनें तो नियंत्रित किंमतीनें त्यास पुरवला आणि कांहीं वेळां ह्यासाठी तो मुद्दाम सक्तीनें गोळा करण्यांत आला. जर्मनीचें युरोपांतील राष्ट्रांस देणें झालें होतें, तें तोडण्याकरितां जर्मन अर्थमंत्र्यांनीं १९४४ सालीं जें तर्कशास्त्र लढवलें, त्यापेक्षा ब्रिटिशांचें सध्याचें तर्कशास्त्र वेगळें नाहीं. हिंदी येणें छाटण्यासाठीं पुढें मांडण्यांत आलेले सर्व ब्रिटिश मुद्दे फोल असून तो हितसंबंधीयांचा केवळ प्रचार आहे. ह्यापेक्षा त्याची ज्यास्त किंमत नाहीं.

### इंग्लंड कर्जफेड करूं शकेल

हिंदुस्थानाचें इंग्लंडमधील साचलेलें येणें कमी करण्यासंबंधीं चालू असलेल्या इंग्रजांच्या प्रचारांत तथ्य नाहीं हें पाहिल्यानंतर उपस्थित होणारा मुख्य प्रश्न इंग्लंडपाशीं हें त्याचें देणें देण्याचें सामर्थ्य आहे काय ? हा होय. इंग्लंडची इतर देशांतील गुंतवणूक संपुष्टांत आली आहे आणि त्याचें आगबोट वहातुकीचें उत्पन्नहि घटलें आहे. अदृश्य आयातीच्या ह्या बाबींची भरपाई करण्याची अवश्यकता इंग्लंडचे बाबतींत निर्माण झाली आहे. १९३८ च्या किंमतीनें ह्या भरपाईची रकम सुमारें २७५ कोटि रुपये होते, परराष्ट्रीय व्यापारांतील किफायतशीरपणा इंग्लंडला प्रतिकूल होण्याचा संभव आहे. तो विचारांत घेतला तर इंग्लंडला आपला निर्गत व्यापार आणखी वाढवावा लागेल. हें सर्व करून, वरतीं आणखी आपलें स्टर्लिंगमधील देणें इंग्लंडला भागवावयाचें आहे. त्या सर्वांचा हिशेब केला तर इंग्लंला आपल्या मालाची निर्गत ७५% ते ८०% वाढविणें जरूर पडेल. ही गोष्ट घडवून आणणें अवघड आहे, परंतु तें इंग्लंडच्या आवाक्याबाहेर खास नाहीं. काम करण्याजोग्या मजुरांपैकीं एक षष्ठांश इंग्रजांना कामावरून बाहेर काढलें आहे ते पुनः कामावर आले म्हणजे उत्पादन पुष्कळच वाढेल व तें निर्गत करतां येईल. परराष्ट्रीय बाजारपेठांस अनुलक्षून ब्रिटिश कारखानदारीची पुनर्रचना अर्थातच करावी लागेल, परंतु त्यांत अडचण भासण्याचें कारण नाहीं. विशेषतः इंग्लंड व त्याचे घेणेकरी ह्यांच्या सहकार्यानें अशी पुनर्रचना सुसाध्य होईल. इंग्लंडच्या कर्जफेडीच्या सामर्थ्याचा विचार दुसऱ्या एका दृष्टीनेंहि करतां येणें शक्य आहे. संक्रमणकालानंतर ब्रिटिशांचें उत्पन्न सरासरी २०% वाढण्याचा संभव आहे. किंमतीच्या वाढीचे ५०% त्यांत मिळवले, तर ब्रिटिश उत्पन्नांतील पैशानें मापली जाणारी वाढ पुष्कळच भरेल. स्टर्लिंग शिलका दरसाल १० ते १२ कोटि पौंडांच्या हप्त्यानें इंग्लंडनें कमी केल्या तर ब्रिटिश राष्ट्रीय उत्पन्न १% ते १½% फार तर घटेल. हा बोजा फार आहे असें कोणीहि म्हणूं शकणार नाहीं. ह्याच मुदतींत इंग्लंडनें जिनसांच्या उपभोगावर व गुंतवणुकीवर किती खर्च केला असतां हें पाहिलें, तर ब्रिटिशांच्या उपभोगाच्या जिनसांच्या उठावाची किंमत १९४८–४९ मध्यें ५% व १९४९–५० मध्यें १०% वाढेल, असा तज्ञांचा अंदाज आहे. दरसाल १०–१२ कोटींची इंग्लंडनें परतफेड केली, तर १९४८ व १९४९ मध्यें इंग्रजांना आपल्या उपभोगांत ५% काट करावा लागेल. परंतु, प्राप्ति ५% ते १०% वाढणार असल्याकारणानें ब्रिटिश रहाणीचें मान मुळींच उतरणार नाहीं; राहणीचें मान सुधारण्याची गति ५% नें कमी होईल, एवढेंच. पुरेशा दीर्घ काळावर परतफेडीची मुदत पसरली, तर आपल्या राहणीच्या मानावर अवास्तव प्रतिकूल परिणाम होऊं न देतां इंग्लंड आपलें स्टर्लिंग देणें देऊं शकेल, असें उपलब्ध आकडे स्पष्ट दाखवतात.

### फळापासून टिकाऊ पदार्थ करणारांची व इतर खाद्य पदार्थ निर्माण करणारांची

## जाहीर सभा

फ्रूट प्रॉडक्टस कंट्रोल ऑर्डर, १९४६ ची अंमलबजावणी ता. १।७।४६ पासून अस्तित्वांत आली आहे. या ऑर्डरची सर्व माहिती देऊन या ऑर्डरप्रमाणें लायसेन्स मिळविण्यासाठीं कोणाकडे व कसा अर्ज करावयाचा आदिकरून प्रश्नाबाबत अनेकांनीं चौकशी केल्यावरून त्याबाबतची सर्व माहिती देण्यासाठीं रूरल प्रॉडक्टस् कं. लि., ९५२, सदाशिव पेठ, गोखले हॉलजवळ, पुणें २ येथें सोमवार, ता. २२।७।४६ रोजीं सकाळीं १० वाजतां सभा भरणार आहे. त्याचवेळीं या ऑर्डरची समग्र माहिती देण्यांत येईल व याबाबत अर्ज वगैरे कोणाकडे करावयाचा त्याबाबतहि माहिती देऊन जरूर त्यांना अर्जांचा नमुनाहि देण्यांत येईल. त्याचप्रमाणें हिंदुस्थान सरकारनें या ऑर्डरबाबत दिल्लीस एक परिषद भरविली होती त्या परिषदेस श्री. न. गं. आपटे हे महाराष्ट्रांतील प्रतिनिधि म्हणून उपस्थित होते. त्या परिषदेंतील चर्चेचीहि माहिती देण्यांत येईल व या ऑर्डरप्रमाणें जरूर त्या गोष्टी एकोप्यानें होणेसाठीं एखादा संघ स्थापण्याबाबत विचारविनिमय केला जाईल. तरी महाराष्ट्रांतील ज्यांना या ऑर्डरप्रमाणें उत्पादन करावें लागणार आहे अशा सर्व कारखानदारांनीं या सभेस यावें अशी विनंति आहे. सभेस येतां न आल्यास वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें संघ स्थापनेस ज्यांची मान्यता आहे अशांनीं पो. बॉ. नं. ३३, पुणें २ या पत्त्यावर श्री. न. गं. आपटे यांचें नांवें आपली अनुमती व समग्र माहिती कळवावी. सभेंत संघ स्थापन करण्याचें ठरल्यास साहाजिकच सभासदांना संघामार्फत सर्व माहिती व मदत मिळेल.

---

### उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयकरण-हिशेबतपासनीसांचा धंदा

ब्रिटिश सरकारनें प्रमुख उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयकरणाची आपली योजना जाहीर केली आहे आणि हिंदुस्थानांतहि तीच प्रवृत्ति दिसून येत आहे. उद्योगधंदे सरकारी मालकीचे झाले, तरी त्यांचे हिशेब लिमिटेड कंपन्यांच्या हिशेबाप्रमाणें लोकांच्या पुढें मांडण्यांत आले पाहिजेत, अशी मागणी "इन्कॉर्पोरेटेड अकौंटंट्स"चे अध्यक्ष मि. वूले ह्यांनीं केली आहे. कोळशाच्या खाणींचा धंदा सरकारी मालकीचा करतांना, हिशेबास प्रसिद्धी देण्याची जबाबदारी पत्करण्यास ब्रिटिश सरकार उत्सुक दिसलें नाहीं. सरकारनें स्वतःकडे घेतलेल्या उद्योगधंद्यांच्या प्रत्येक गटाचा हिशेबहि स्वतंत्रपणें उपलब्ध झाला पाहिजे, असें मि. वूले हे म्हणाले. उद्योगधंदे सरकारी मालकीचे झाले म्हणजे कंपन्यांचे हिशेब तपासण्याचा धंदा करणाऱ्या ऑडिटर लोकांस मिळणारें काम कमी होईल ही महत्त्वाची गोष्ट वरील टीकेच्या मुळाशीं आहे. सहाजिकच, उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयकरणामुळें होणारें देशाचें नुकसान हिशेब तपासनीसांच्या डोळ्यांत तात्काळ भरत आहे. सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांचे हिशेब चोख ठेवले पाहिजेत व त्यांस पुरेशी प्रसिद्धी मिळाली पाहिजे, ही मि. वूले ह्यांची सूचना योग्य अशीच आहे.

---


**दि. व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.



**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार








**डुप्लीकेटर्स** घरगुती छपाईचें उत्कृष्ट यंत्र!

फक्त एका वर्षाच्या प्रिंटिंगच्या खर्चांत विकत मिळणारें, साधें व सुटसुटीत, हरकामी, लहान-मोठे व्यापारी, कारखानदार, शिक्षण व इतर संस्था, क्लब्ज वगैरेंना नेहमीं लागणारें प्रिंटिंगचें काम या यंत्रावर सुबक रितीनें मिळतें. कॅशमेमोज, बिल फॉर्मस, सर्क्युलर्स, दर पत्रकें, हँडबिल्स, परीक्षेचे पेपर्स वगैरे सर्व प्रकारचीं व सर्व भाषेंतील प्रिंटिंगचीं कामें या यंत्रावर होतात.

अधिक माहिती व किंमतीबद्दल आजच लिहा.

कारखानदारः—

**शेवडेज कॅमेरा वर्क्स लि.**

ठळकवाडी, बेळगांव





## हिंदी मच्छीमारीच्या धंद्यास वाव

### खतें घालून माशांची लागवड करतां येईल काय ?

ठाणें जिल्हा कोळी परिषद ७ जुलै रोजीं भरली होती. तिचें उद्घाटन मुंबई प्रांताचे उद्योगमंत्री श्री. तपासे ह्यांनीं केलें. त्यावेळीं त्यांनीं आपल्या भाषणांत मच्छीमारीच्या धंद्याचें राष्ट्रीय महत्त्व वर्णन करून सरकार त्या धंद्याचें पुनरुज्जीवन करणार असल्याचें सांगितलें. मच्छीमारीचा धंदा भांडवलदाराचे हातीं जाऊं नये, त्याची सहकारी तत्त्वावर संघटना व्हावी, अशी सरकारची इच्छा आहे असेंही ते म्हणाले. हिंदुस्थानांतील तीव्र दुष्काळ आणि अन्नाचा तुटवडा ह्यांनीं हिंदी मच्छीमारीच्या धंद्याकडे लोकांचें व सरकारचें लक्ष वेधलें आहे. शेतकी कमिशननें कितीतरी वर्षांपूर्वी ह्या धंदा वाढविण्याचें अगत्य प्रतिपादन केलें आहे. खाद्य म्हणूनच केवळ नव्हे, तर औषधी व औद्योगिक उपयोगाची जिन्नस ह्या दृष्टीनें माशांचें महत्त्व फार आहे. सध्या हा धंदा सुसंघटित नाहीं आणि तो चालविण्यांत सहकार्य किंवा कार्यक्षमताहि आढळत नाहीं.

हिंदुस्थानांत माशांचा उठाव दरमाणशीं दरसाल ३.४ पौंड इतका आहे. प्रमुख प्रांतवार उठावाचा अनुक्रम खालीं दिला आहे:—

| प्रांत किंवा संस्थान | दरमाणशीं खप ( पौंड ) |
|---|---|
| कोचिन | १७.१९ |
| त्रावणकोर | १४.७१ |
| मद्रास | ८.१६ |
| सिंध | ७.९१ |
| बलुचिस्तान | ७.७७ |
| मुंबई | ६.८५ |
| बंगाल | ६.७३ |
| आसाम | ३.६४ |
| ओरिसा | ३.४८ |
| बाकीचे प्रांत | ३ पौंडापेक्षां कमी |

हिंदुस्थानांत दरसाल खाऱ्या पाण्यांतील ३ कोटि रुपये किंमतीचे १½ कोटि मण मासे पकडण्यांत येतात. गोड्या पाण्यांतील मासे ६० लक्ष मण भरतात व त्यांस ७½ कोटि रुपये किंमत येते. समुद्रांतील माशांची सरासरी किंमत २ रु. १० आ. पौंड, तर गोड्या पाण्यांतील माशांची किंमत ११ रु. १४ आ. पौंड येते. एकूण माशांपैकीं निम्मे मासे ताजेपणीं खाण्यांत येतात. एक दशांशाचा खतांकडे उपयोग केला जातो. मासे टिकवून ते खाण्यासाठी वापरण्याचा प्रचार करतां येण्याजोगा आहे.

हिंदुस्थानांतील खाद्य पदार्थ अधिक पिकविण्याच्या मोहिमेंत मच्छीमारीस महत्त्वाचें स्थान आहे, हें उघड आहे. तथापि, तें महत्त्व केवळ तात्कालिक स्वरूपाचें नाहीं. असलेले मासे पकडणें, एवढ्यापुरताच हा धंदा आज मर्यादित असला तरी मोठ्या प्रमाणावर माशांची संख्या वाढविणेंहि कालांतरानें शक्य होणार आहे, असें दिसतें. शास्त्रज्ञांच्या प्रयोगावरून असें दिसून येतें कीं जसें खत घालून पीक अधिक निघूं शकतें तसेंच पाण्यांत खत घातल्यास मासेहि अधिक निघतात. प्रत्येक माशाची मादी हजारों अंडीं घालते पण त्यांतील फारच थोडे मासे मोठे होईपर्यंत जगतात. याचें कारण मुख्यतः खाण्याची कमतरता होय असें दिसतें. ज्याप्रमाणें जमिनीवरील जनावरांची पैदास कुरणांच्या वाढीवर अवलंबून आहे, त्याचप्रमाणें माशांची वाढ समुद्रांतील वनस्पतींवर अवलंबून आहे. मात्र ह्या वनस्पती म्हणजे तळाशीं उगवणाऱ्या वनस्पती नाहींत. या वनस्पती पाण्यांत अर्धवट तरंगत असतात व त्यांस फायटोप्लँक्टन असें सर्वसाधारण नांव आहे. यांवर कांहीं लहान कृमि जगतात व त्यांवर लहान मासे जगतात. हे मासे मोठ्या माशांचें खाद्य होत. फायटोप्लँक्टन वाढविण्यास पाण्यांत नायट्रेट व फॉस्फेट खत शास्त्रज्ञांनीं टाकलें. लवकरच तळ्यांतील माशांची संख्या दुप्पट झाली व कांहीं माशांचें वजन २५ पटींनीं वाढलें ! आर्थिक दृष्टीनें हें कितपत परवडतें हें पाहिलें पाहिजे. परंतु शास्त्रीय दृष्टीनें प्रयोग यशस्वी झाले आहेत हें निश्चितपणें दिसतें. हेच प्रयोग आतां अधिक मोठ्या प्रमाणावर चालू आहेत.

## शेअर बाजार

ले.:—श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम., पुणें ५.

टाटास्टीलचें व्याज बाहेर पडणार आहे त्यामुळें स्टील शेअर चांगलेच मजबुतींत आहेत. मात्र शुक्रवारीं बदले करतांना डिफर्डला ३५ रुपयांपर्यंत गाळा द्यावा लागला. याचें एक कारण टाटाच्या वह्या १ ऑगस्टला बंद होत आहेत व दुसरें सट्टेवाल्यांची घेवाळी बरीच मोठी हें आहे. इकडे कापड व सुताचे भाव टेक्स्टाईल बोर्डानें वाढविल्यामुळें विशेषतः जाडें भरडें सूत व कापड काढणाऱ्यांच्या गिरण्यांचे भाव बरेच चढले आहेत. डाईंगचा भाव ३००० जाईल म्हणून सुद्धां बोलतात. अपोलो, इं. युनायटेड यांचेही आतां भाव विशेष जोरांत येत आहेत. अपोलोंत तीन वर्षांमागें अडकलेल्या पुणेकरांनीं हळू हळू आतां ते विकण्याच्या मार्गास लागावें. जाणते दलाल या भावांत घेण्यास सांगत नाहींत पण बाजार मात्र वर जात आहे त्यामुळें परचुरण गिऱ्हाईकाला सट्टा खेळून पाहण्याचा मोह आवरत नाहीं. हा मोह आणखी दोन महिन्यानंतर टाटा व्याजबाद झाल्यावर घातक ठरणार आहे. आमचे मतें मुंबई व कलकत्ता बाजारांत हात लावण्याच्या लायकीचा एकही शेअर सध्यां नाहीं. मात्र मद्रासकडचे पेरियावरमलाई, पीरमेड, व इतर चांगले चहाचे आणि थिरुवांडीसारखे रबर शेअर उचलण्यास उत्तम वाटतात.


३॥ टक्के सरकारी प्रॉमिसरी नोटा

नव्या सरकारी रोख्यांत बदलून देण्यांत येणार आहेत त्यासंबंधींचें सर्व काम विनामूल्य करण्यांत येईल.

ऑफिसः—पू. इ. सप्लाय कं. चे वर
किताब बिल्डिंग, दुसरा मजला, लक्ष्मी रोड, पुणें २.

वेळः—दुपारीं ११ ते १

व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्.
शेअर अँड स्टॉक ब्रोकर.

तोच सुदिन
कीं
ज्या दिवशीं भारतावर
स्वातंत्र्यसूर्य चमकेल

पण हा सुदिन आपण स्वयंसिद्ध झाल्याविना कसा दिसेल !

याकरतां देशांतील सर्व उद्योगधंदे पूर्ण राष्ट्रीय करून परदेशांत जाणारा द्रव्यौघ थांबविणें, हें आपलें आद्यकर्तव्य ठरतें. तरी आयुष्याच्या विम्याचा धंदा करणारी

येथील सुप्रसिद्ध

कॉमनवेल्थ

विमा कंपनी लि.,

येथें आपला स्वतःचा विमा उतरून आपल्या कर्तव्यांतून मुक्त व्हा.

एजन्सीसाठीं आजच लिहा अगर भेटा

ल. ब. उर्फ अण्णासाहेब भोपटकर—अध्यक्ष

व एस. एम. जोशी—मॅनेजिंग डायरेक्टर

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. वा. पु. वर्दे, श्री. न. ग. पवार, श्री. श्री. गो. मराठे,
श्री. र. चिं. सोहनी, श्री. मा. रा. जोशी, श्री. फ. दो. पदमजी,
श्री. म. वि. गोखले, श्री. मा. वि. शहा.

—भाण्डवल—

अधिकृत रु. ५०,००,००० खपलेलें रु. २५,००,०००
जमा रु. १२,५०,००० रिझर्व्ह व इतर फंड
रु. ३,००,०००
एकूण खेळतें भाण्डवल रु. १,७०,००,०००

—:शाखा:—

डेक्कन जिमखाना, खडकी, मुंबई (फोर्ट) गिरगांव, जळगांव, नागपूर, कोपरगांव, रत्नागिरी, व फैजपूर (पे–ऑफिस)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एक्झिक्यूटर व ट्रस्टी कंपनीचे कामास सुरवात झाली आहे.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

फोन नं. ४८३ — तारेचा पत्ता " Cencobank " — पोस्टबॉक्स नं. ११

मुख्य कचेरी:—लक्ष्मीरोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

# बिनचूकच्या माहितीनें


स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.

किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.

पूना स्टॉकिस्ट : सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
——इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत :——

# पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

महाराष्ट्र शारदेचीं तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून

# पैसा व ज्ञान मिळवा !

**श्रीमंत कसें व्हावें**—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक। हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षाधीश व्हा। किं. १॥ रु.

**१०० टक्के यश**—हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील। किं. १॥ रु.

**काम आणि कामिनी**—तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें। अत्यंत लोकप्रिय. किं. १॥ रु.

**मृत्युलोकचा प्रवास**—मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल। किं. १ रु.—चारीं पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ।

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.